दि. 26/02/2023

1) पुढारी पान क्र. 5

## ऑनलाईन गुन्ह्यांविरुद्ध मार्गदर्शन

**मिरारोड** - मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील मिरा-भाईंदर परिसरातील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांची जनजागृती व्हावी यासाठी शुक्रवारी मिरा रोड येथील सेंथोम पब्लीक स्कूल व सायबर गुन्हे शाखेच्या संयुक्तपणे विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १५ शिक्षक व आठवी, नववी, दहावीचे एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थी संवाद मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांना दैनंदीन सोशल मीडिया वापराबाबत होणारे गुन्हे, तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज व त्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. यावेळी अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त गुन्हे, अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांच्या उपस्थितीत पार पडला.

2) लोकमत पान क्र. 3

## खोटे दागिने गहाण ठेवून कर्ज

**मीरा रोड :** सोन्याचे खोटे दागिने बँकेत तारण ठेवून बँकेकडून ६ लाख ७१ हजारांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणूक करणाऱ्या खातेधारकावर भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पोलिस ठाण्याजवळ इंडियन ओव्हरसीज बँकेची शाखा आहे.

पूर्वेच्या तलाव मार्गावरील राजेश्वरी इमारतीत राहणाऱ्या खातेधारक राजकुमार तिवारी याने जुलै २०२१मध्ये बँकेत २ सोन्याचे ब्रेसलेट व ६ सोन्याच्या चेन असे २१९ ग्रॅमचे दागिने तारण ठेवून बँकेतून ६ लाख ७१ हजारांचे कर्ज घेतले होते. बँकेचे नियुक्त सराफ इंदू वर्मा यांनी तपासणी केली असता, ते दागिने खोटे असल्याचे आढळले.

3) पुढारी पान क्र. 2

# मनसेच्या इशाऱ्यानंतर रेल्वे आरक्षण केंद्रांवर मराठी भाषेतील अर्ज दाखल

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

पश्चिम रेल्वेवरील भाईंदर रेल्वे स्थानकातील आरक्षण केंद्रावर मराठी ऐवजी गुजराती भाषेतील अर्ज प्रवाशांना वितरीत केले जात असल्याचे निदर्शनास येताच मनसे शहर अध्यक्ष हेमंत सावंत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने रेल्वे प्रशासनाची भेट घेत तात्काळ मराठी भाषेतील अर्ज उपलब्ध करून देण्याची मागणी केली केली. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला असता रेल्वे प्रशासनाने शनिवारी आरक्षण केंद्रावर गुजराती ऐवजी मराठी भाषेतील अर्ज वितरीत करण्यास सुरुवात केली.

केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्र राज्यातील केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांमध्ये इंग्रजी, हिंदी भाषेसोबतच मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या राजभाषा विभागाकडून १८ जून १९७७ व १ जुलै २०१० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये तसेच ५ डिसेंबर २०१७ व ६ नोव्हेंबर २०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रादेशिक भाषेचा वापर करण्याचे निर्देश राज्यातील सर्व रेल्वे कार्यालयांना देण्यात आले आहेत. मात्र काही केंद्र शासनाच्या कार्यालयातील अमराठी अधिकारी शासनाच्याच आदेशाला केराची टोपली दाखवून मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करतात. त्यात भाईंदर रेल्वे स्थानकातील आरक्षण केंद्राचा समावेश असून या केंद्रावर इंग्रजी, हिंदी भाषेसह मराठी नैवजी चक्क गुजराती भाषेतील छापील अर्ज प्रवाशांना वितरीत करण्यात येत होते. त्याची माहिती मनसेला मिळताच मनसे शहर अध्यक्ष सावंत यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने रेल्वे प्रशासनाला निवेदन देत गुजराती ऐवजी मराठी भाषेतील छापील अर्ज प्रवाशांना देण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. त्याची दखल घेत रेल्वे प्रशासनाने शनिवारी मराठी भाषेतील अर्ज वितरणास सुरुवात केली. यापूर्वी देखील भाईंदर रेल्वे स्थानकाचे नाव भायंदर असे लिहिले जात होते. ते मराठी भाषेत भाईंदर असेच लिहिले जावे, यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाकडे मराठी एकीकरण समितीने पाठपुरावा केला.

त्याची दखल घेत रेल्वेने भायंदरचे भाईंदर असे मराठी नामकरण केले. यापुढे मराठी भाषेचा अपमान केल्यास मनसे सहन करणार नाही तसेच इंग्रजी व हिंदीसह मराठी भाषे खेरीज इतर कोणत्याही भाषेतील आरक्षण अर्ज प्रवाशांना वितरीत करू नये तसे केल्यास मनसे खळखट्याक केल्याशिवाय राहणार नाही, असे सावंत यांनी रेल्वे प्रशासनाला सुनावले.

CS CamScanner

Scanned with CamScanner

4) पुण्यनगरी पान क्र. 2

दि. 26/02/2023

# पोलीस ठाण्यात एकाच्या मृत्यूने खळबळ

## पोलिसांनी मारहाण केल्याचा कुटुंबीयांचा आरोप

### न्यायदंडाधिकारी करणार स्वतंत्र चौकशी



**कल्याण :** कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलीस ठाण्यात एका ज्येष्ठ नागरिकाचा अचानक मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. दीपक भिंगारदिवे (६३) असे त्यांचे नाव आहे. पोलिसांनी केलेल्या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप भिंगारदिवे कुटुंबीयांनी करीत न्याय मिळत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा इशारा दिला. तर पोलिसांनी हे आरोप फेटाळून लावत याप्रकरणाची सीआयडीमार्फत पुढील तपास करण्यात येत असल्याचे स्पष्टीकरण दिले. दरम्यान, राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही पोलिसांनी मारहाण केल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे ट्विट केल्याने हे प्रकरण चांगलेच तापण्याची चिन्हे आहेत.

कोळसेवाडी पोलिसांनी शुक्रवारी रात्री प्रशिक भिंगारदिवे या तरुणाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. याची माहिती मिळताच त्याचे वडील दीपक भिंगारदिवे व भाऊ पोलीस ठाण्यात आले. वडील आपल्याशी बोलत असताना मोबाइलवर शूटिंग करत असल्याने पोलिसांनी त्यांना थेट मारहाण करीत पोलीस ठाण्यात नेले. तेथे काही वेळातच त्यांचा मृत्यू झाला. रुक्मिणीबाई रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. फिट आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे कारण पोलिसांनी सांगितले. मात्र पोलिसांच्या मारहाणीतच त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप प्रशिक भिंगारदिवे याने केला. जोपर्यंत संबंधित पोलिसांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, आम्हाला न्याय हवा, त्यासाठी उपोषणही करू, असा इशाराही कुटुंबीयांनी यावेळी दिला.

दरम्यान, या घटनेसंदर्भात स्पष्टीकरण देताना कल्याणचे पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांनी सांगितले की, शुक्रवारी रात्री ऑल आऊट ऑपरेशनदरम्यान प्रशिक भिंगारदिवे या तरुणाला चौकशीसाठी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आणले होते. आपल्या मुलाला का आणले, याची चौकशी करण्यासाठी त्याचे वडील दीपक भिंगारदिवे पोलीस ठाण्यात आले. प्रशिकची विचारपूस पोलीस करत असताना दीपक भिंगारदिवे हे त्यांच्या मोबाइलमधून शूटिंग करत होते आणि पोलिसांशी बाचाबाची करत होते. म्हणून त्यांना ठाणे अंमलदार कक्षाच्या मागे बसवण्यात आले होते. तिथे फिट येऊन पडल्याने त्यांना तत्काळ दवाखान्यात पाठवले असता, तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. या संपूर्ण प्रकाराची व्हिडीओ शूटिंग पोलीस स्टेशनला असणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये झालेली असून, हे रिझर्व्ह केलेले सीसीटीव्ही रेकॉर्डिंग सीआयडीकडे पुढील तपासासाठी देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या संपूर्ण प्रकाराच्या चौकशीसाठी सीआयडी अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आलेले असून ते रात्रीच हजर झाले असल्याचे सचिन गुंजाळ यांनी सांगितले.

दीपक भिंगारदिवे यांचा इनक्वेस्ट पंचनामा, तसेच पोस्टमार्टम प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी करण्यासाठी ठाणे मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी आदेश दिलेले आहेत. इनक्वेस्ट पंचनामा आणि पोस्टमार्टम हे व्हिडीओ शूटिंगमध्ये करण्यात येणार आहे. तसेच संपूर्ण प्रकरणाचा तपास हा सीआयडीकडून होणार असून, स्वतंत्र चौकशीही प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडून होणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांनी दिली.

**ठाण्यात ही मगुरी आली कुठून**

आ. जितेंद्र आव्हाड यांनीही दीपक भिंगारदिवे यांचा मृत्यू हद्दीत नव्हे, पोलीस चौकीत झाल्याचा आरोप केला. त्यांच्या मुलाला नाक्यावर उभा आहे म्हणून पोलीस उचलून घेऊन गेले. बाप मुलाची काळजी म्हणून सोडवायला गेला, सोडवणे राहिले बाजूलाच. त्याला इतके मारले की काही मिनिटांतच तो तिथे मरण पावला. ही कुठल्या प्रकारची दादागिरी आहे. त्याचा पोरगा गुन्हेगार नाही की स्वतःही नाही. आता त्याची पत्नी काय करेल, कोण जबाबदार याला? ही मगुरी कशामुळे आली आहे ठाण्यात. कायदा बाजूलाच ठेवून द्या, मारो, झोडो, केस डालो, निकल जाओ, अशी परिस्थिती सध्या ठाण्यात आहे, असा आरोपही त्यांनी ठाणे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त करताना केला.

5) पुढारी पान क्र. 3

# गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या आरोपीस अटक

**मिरा रोड :** तुळींज पोलीस ठाणे हद्दीत गावठी बनावटीचा कट्टा विक्रीसाठी घेऊन आलेल्या इसमास गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी अटक केली आहे. गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांना माहिती मिळाली की, ओम साई पॅलेस बारचे जवळ, ओसवाल नगरी, नालासोपारा या ठिकाणी एक इसम गावठी बनावटीचा कट्टा विक्रीसाठी घेवून येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार शाहुराज रणवरे, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी गुन्हे शाखेतील अधिकारी, अमलदार यांच्यासह सापळा रचून आरोपी पृथ्वीराज कुंदनप्रसाद भारती यास काळ्या रंगाची ॲक्टीव्हा मोटार सायकल सह ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातुन १ गावठी बनावटीचा कट्टा (अवैध अग्निशस्त्र), २ जिवंत काडतुसे आणि १ रामपुरी चाकू असे हत्यारे मिळून आल्याने त्याला मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. या आरोपीविरुद्ध तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे हे करत आहेत.

6) पुण्यनगरी पु. पान क्र. 2

# वसई-विरारमध्ये मनोरुग्णांच्या वावरामुळे महिलावर्गात भीती

**वसई :** वसई-विरारमध्ये सध्या मनोरुग्णांच्या संख्येत वाढ होत असून मनोरुग्ण ठिकठिकाणी नग्न अवस्थेत फिरत असल्यामुळे महिलावर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. वसई-विरार महानगरपालिकेकडे अशा मनोरुग्णांसाठी सध्या कोणतीच उपाययोजना नसल्यामुळे याचा त्रास शहरातील महिलावर्ग, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. तर यांच्यासाठी पालिकेने एखादे मनोरुग्णालय उभारावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

वसई-विरार शहरातील मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर तसेच रेल्वे स्थानकाच्या शेजारी मोठ्या प्रमाणात मनोरुग्ण बसलेले असल्याचे चित्र दिसून येत आहे. तर सकाळच्या सुमारास हे मनोरुग्ण रस्त्याने चालत असतात

CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत पू. पान क्र. १

दि. 26/02/2023

(7)

# महापालिका पथकाला धक्काबुक्की महागात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी आलेल्या पालिका पथकास अडकवून ठेवत धक्काबुक्की, शिवीगाळ करून कारवाई रोखणाऱ्या विकासकावर आता एमआरटीपीअंतर्गत आणखी एक गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पश्चिमेस सॉलिटेअर हाईट्समध्ये विकासक कल्पेश जैन व प्रकाश जैन यांनी मोकळ्या जागेत यांत्रिक पार्किंग तसेच अन्य बेकायदा बांधकाम केल्याची तक्रार आल्यानंतर २१ फेब्रुवारीला प्रभाग समिती १ च्या सहायक आयुक्त कांचन गायकवाड यांच्यासह पालिका पथक कारवाईला गेले होते. त्यावेळी विकासक व साथीदारांनी कारवाई बंद करायला लावली. यावेळी पथकास धक्काबुक्की करीत इमारत आवारातच कोंडून ठेवले. पोलिसांनी येऊन पथकाची सुटका केली होती.

आता गायकवाड यांच्या फिर्यादीवरून २४ फेब्रुवारी रोजी विकासक कल्पेश जैन व प्रकाश जैन यांच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. एमआरटीपीनुसार भाईंदर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात विकासकासह सल्लागार अभियंता मे. बी.ए.सी. प्लॅनर्स अँड इंजिनीअरदेखील आरोपी आहेत.

(8)

# मोटारीवर कलंडला आणि बेकायदा रेती गुन्हा दाखल झाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एका गृहनिर्माण संस्थेतील कामासाठी आलेल्या रेतीच्या डंपरमुळे सांडपाण्याची चेम्बर तुटली व डंपर बाजूला उभ्या मोटारीवर कलंडला. घटनेची माहिती पोलिसांना मिळाली व चौकशी केली असता डंपरमधील रेती बेकायदा असल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल करून डंपर व त्यातील रेती असा ४० लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मीरारोडच्या प्लेझंट पार्क भागातील डॉन बॉस्को शाळेमागे पूनम व्हॅली संकुलमध्ये कामानिमित्त लागणारी रेती टाकण्यासाठी डंपर आला होता. त्यावेळी सोसायटीसह सांडपाणी वाहून नेणाऱ्या ड्रेनेज लाइनच्या चेम्बरची झाकणे डंपरच्या वजनाने तुटली आणि चाक त्यात रुतून डंपर हा मोटारकारवर कलंडला. डंपर कारवर कलंडल्याने कार दबल्याने नुकसान झाले.

घटनास्थळी लोकांनी गर्दी पाहून मध्यरात्री गस्तीवर असलेले काशीमीरा पोलिस ठाण्याचे पोलिस शिपाई रामधन डोभाळ यांनी जाऊन पाहिले असता घडला प्रकार निदर्शनास आला. त्यांनी पोलिस उपनिरीक्षक धनंजय गायकवाड यांना माहिती दिल्यावर ते देखील आले. पोलिसांनी डंपर चालक प्रदीप भताणेकडे विचारणा केली असता डंपर हा एस. एम. एंटरप्रायजेस या कंपनीचे मालक पद्माकर भताणे यांचा असे सांगितले. डंपरमधील ७ ब्रास रेती ही भिवंडी येथून आणली असून, त्यांच्याकडे रॉयल्टीची कागदपत्रे नव्हती. पोलिसांनी डंपर व त्यातील रेती असा ४० लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त करून चालक व मालकांवर गुन्हा दाखल केला आहे.

(9)

# सलूनआड वेश्याव्यवसाय; मुलीसह तरुणीची सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडमध्ये स्पा सलूनआड अल्पवयीन मुलीसह तरुणीस वेश्याव्यवसाय करायला लावणाऱ्या तिघांवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने गुन्हा दाखल केला आहे. दोघांना अटक झाली असून महिला आरोपीचा तपास सुरू आहे.

मीरा रोडच्या सेक्टर ५, न्यू शांतीनगर, शांती प्लाझामध्ये सॉफ्ट टच स्पा अँड सलूनमधून वेश्या व्यवसाय चालवला जात असल्याची माहिती पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळाली होती. त्याआधारे अहिररावसह उमेश पाटील, विजय निलंगे, सम्राट गावडे, केशव शिंदे, अपर्णा गायकवाड यांच्या पथकाने सापळा रचून बोगस गिऱ्हाईक पाठविले. बोगस गिऱ्हाईकाकडून स्पाचालक तौसिफ खान (वय २३, रा. अंधेरी) याने पैसे घेऊन सफाई कर्मचारी गोपालकुमार माली याला सांगून अल्पवयीन मुलगी पाठविली. खात्री पटताच पोलिसांनी छापा टाकून तौसिफ आणि गोपालकुमार यांना पकडले. तेथून १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी, २८ वर्षीय तरुणीची पोलिसांनी सुटका केली. या प्रकरणी नयानगर पोलिसात २२ फेब्रुवारीला गुन्हा दाखल झाला असून, तिसरी आरोपी हिना कुरेशी हिचा शोध सुरू आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 26/02/2023

10) म.टा पान क्र. 3

# बॉम्बच्या फोनने यंत्रणांची धावपळ

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

मुंबईच्या बंदरात ९० किलो स्फोटके उतरविण्यात आली असून याचा वापर करून दक्षिण मुंबईत बॉम्बस्फोट घडविण्यात येणार असल्याचे मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षामध्ये फोनद्वारे कळवण्यात आले. या फोनमुळे पोलिसांची यंत्रणा कामाला लागली. पोलिसांनी पूर्ण गोपनीयता राखत संवेदनशील परिसरात झाडाझडती घेतली. संशयास्पद असेच काहीच हाती सापडले नाही. दुसरीकडे पोलिसांनी खोटी माहिती देणाऱ्या तरुणास अवघ्या नऊ तासांत डहाणू येथून अटक केली,

मुंबई पोलिसांच्या दक्षिण नियंत्रण कक्षामध्ये शुक्रवारी दुपारी एक फोन आला. मुंबईच्या बंदरात गुरुवारी ९० किलो स्फोटके उतरविण्यात आली आहेत. या स्फोटकांचा वापर जे. जे. रुग्णालय, नळ बाजार आणि भेंडी बाजार या परिसरात स्फोट घडवून आणण्यासाठी करण्यात येणार असल्याचे फोन करणाऱ्याने सांगितले. या माहितीची गंभीर दखल घेत ती गोपनीय ठेवण्यात आली. या परिसरातील सर्व महत्त्वाची स्थळे पोलिसांनी पिंजून काढली. मात्र संशयास्पद वस्तू किंवा व्यक्ती आढळली नाही.

पोलिसांनी दुसरीकडे फोन करणाऱ्याचा शोध सुरू केला होता. तांत्रिक पुराव्यांच्या आधारे फोन करणारी व्यक्ती पालघर जिल्ह्यातील डहाणू परिसरात असल्याचे समजले. पोलिसांनी डहाणू परिसरात शोध घेत अश्विन म्हैसकर याला ताब्यात घेतले. अश्विन हा मूळचा नागपूर येथील असून बेरोजगार असल्याचे चौकशीतून समोर आले. याच नैराश्येतून त्याने हे कृत्य केल्याचे म्हटले जात आहे.

11) लोकमत पान क्र. 8

# 'स्पेशल २६' स्टाइल छापा

## चौघांना अटक; ओळखीच्या महिलेनेच केले कृत्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** अँण्टिकरप्शनचे पोलिस आणि न्यूज रिपोर्टर असल्याचे सांगून 'स्पेशल २६' चित्रपटाप्रमाणे एका महिलेच्या घरावर दहाजणांच्या टोळक्याने छापा टाकल्याचा बहाणा केला. वेश्या व्यवसाय करीत असल्याचा गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवून महिलेला लुबाडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी धनकवडीतील एका सोसायटीत राहणाऱ्या ४० वर्षांच्या महिलेने सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सीमा शशिकांत शिंदे (३०, रा. अपर इंदिरानगर), रमेश कंक (४५, रा. नऱ्हे), कार्तिक कांबळे (२०, रा. कात्रज), स्वप्निल कांबळे (२१, रा. आंबेगाव) यांना पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने २७ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.




### मैत्रिणीने घडवून आणला प्रकार

सीमा शिंदे ही फिर्यादीची मैत्रीण आहे. तिला माहिती होते की, घरात फक्त महिला असतात. तसेच तिच्याकडे दागिने असल्याचे तिला माहिती होते. त्यातून तिने हा प्रकार घडवून आणला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या महिलेच्या घरी रात्री काहीजण आले. त्यांनी आम्ही अँण्टिकरप्शनचे पोलिस व न्यूज रिपोर्टर असल्याचे सांगितले. महिला, तिच्या मुलांना व भाचीला मारहाण केली. तुम्ही येथे वेश्या व्यवसाय करीत आहात, असे खोटे सांगून तुमच्यावर केस करतो, अशी धमकी दिली. केस ताबडतोब मिटविण्यासाठी फिर्यादीकडून १४ हजार रुपये रोख व ७० हजार रुपयांचे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा ८४ हजार रुपयांचा ऐवज घेऊन गेले.

हा प्रकार सुरू असताना त्यांच्या ओळखीची सीमा शिंदे ही सोसायटीच्या बाहेर उभी असल्याचे फिर्यादीच्या मुलाने पाहिले होते. पोलिसांनी केलेल्या तपासात तिनेच सहकाऱ्यांच्या मदतीने हा बनावट छापा घडवून आणला असल्याचे निष्पन्न झाले.

CamScanner
Scanned with CamScanner

# फसवणूक करणाऱ्या बंटी-बबलीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : रस्त्यात लोकांना मोबाइल बंद झाल्याचे सांगून त्यांच्याकडून फोन करण्यासाठी मोबाइल घेऊन तो घेऊन पळून जाणाऱ्या बंटी-बबलीला गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांनी अटक केली आहे. नालासोपारा आणि माणिकपूर या दोन पोलिस ठाण्यांतील दोन गुन्ह्यांची उकल केली आहे. लाखोंचा मुद्देमाल आरोपींकडून हस्तगत करत तपास व चौकशीसाठी आरोपींना माणिकपूर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

नालासोपाऱ्याच्या वेस्ट ॲव्हेन्यू सोसायटीत राहणारा उमर अल हक (२१) हा तरुण १ फेब्रुवारीला सिविक सेंटरवरून सोपारा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून चालत होता. त्यावेळी वॅग्नार कारमधून आलेल्या आरोपी बबलीने माझ्या मोबाइलची बॅटरी संपली असून, मला फोन करायचा आहे, असे सांगून उमरकडून रिअल मी कंपनीचा मोबाइल घेतला. सोबत असणाऱ्या आरोपी बंटीने रोडच्या बाजूला गाडी घेतो, असे म्हणून गाडी बाजूला न घेता पळून गेले. लबाडीच्या इरादाने मोबाइलची चोरी केली म्हणून तरुणाने नालासोपारा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेच्या युनिट-३ चे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांना या आरोपी बंटी-बबलीबाबत माहिती मिळाली. त्यांच्या टीमने नायगावमधून आरोपी बंटी-बबलीला ताब्यात घेतले. ऋषिकेश जीडी (२१) व मुस्कान शहा (१९) अशी या बंटी-बबलीची नावे आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Feb 26, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner





CMYK

MHT

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

# मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई, रविवार 26 फरवरी 2023

संपादक: विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष -18, अंक-48 | पृष्ठ-8 | मूल्य ₹5/- | संरक्षक: राजन पांडेय / सुनित अग्रवाल



सम-सामयिक घटना
की जानकारी रखने वा
अनुभवी,इच्छुक महि
व पुरुष पत्रकारों
आवश्यकता है। वेत
योग्यतानुसार दिया जाएग
मो०-986761476
-संपाद


| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, फाल्गुन शुक्ल पक्ष सप्तमी | 07.03 am / 06.41 pm | सुबह मौसम साफ रहेगा। दिन में तापमान बढ़ेगा। | अधिकतम 33°C / न्यूनतम 23°C | NSE Open: 17,591.35 \| Close: 17,465.80; BSE Open: 59463.93 \| Close: 59463.93 | Rs. 56,510 Per 10 gm; Rs. 68,300 Per Kg. |

## अवैध हथियार के साथ एक शख्स गिरफ्तार



**वसई ;** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट ने अवैध हथियार के साथ एक शख्स को गिरफ्तार किया है। उसके पास से टीम ने जिंदा कारतूस,गावठी कट्टा व रामपुरी चाकू आदि जप्त किया है।यह सफलता क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट के पी. आई शाहुराज रणवरे,स.पो.नि. सागर शिंदे व सुहास कांबले की टीम ने पाई है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है। पुलिस ने बताया कि 25 फरवरी (शनिवार ) को क्राइम ब्रांच 2 वसई को गुप्त सूचना मिली कि ओम साई पॅलेस बार के पास ओस-वालनगरी,नालासोपारा पूर्व स्थित एक शख्स गावठी निर्मित कट्टा बिक्री करने के लिए आने वाला है।सूचना के आधार पर शाहूराज रणवरे, पुलिस निरीक्षक, क्राइम ब्रांच यूनिट 2, वसई व टीम के अधिकारी व कर्मचारियों ने उक्त स्थान पर जाल बिछाया और आरोपी पृथ्वीराज कुंदनप्रसाद भारती,निवासी-जानकी पाडा,आंबेडकरनगर, गोखीवरे,वसई पूर्व को दबोच लिया,दरअसल आरोपी मोटरसाइकिल क्र.एमएच 04-डीसी 3469 से आया था, फिलहाल,टीम द्वारा आरोपी की तलाशी ली तो इसके पास 1 गावठी कट्टा,2 जिंदा कारतूस और 1 रामपुरी चाकू जप्त किया गया।वही तुलिंज पुलिस स्टेशन ने क्राइम ब्रांच 2 में कार्यरत पुलिस हवलदार सचिन पाटिल की शिकायत पर उक्त आरोपी के ऊपर कलम 3,25 (1) व अन्य धाराओं के तहत केस दर्ज कर लिया है।


Scanned with CamScanner

# सायबर गुन्हे शाखेकडून विद्यार्थी संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांच्या अनुषंगाने जनजागृती व्हावी याकरिता सैंथोम पब्लिक स्कूल व सायबर गुन्हे शाखेच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी सैंथोम पब्लिक स्कूल, मीरारोड येथे विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



या मेळावामध्ये विद्यार्थ्यांना दैनंदिन सोशल मीडिया वापराबाबत होणारे गुन्हे, तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत जनजागृती करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज, त्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. हा विद्यार्थी संवाद मेळावा पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सायशा दलाल, विग्नेश भिसे यांच्या उपस्थितीत पार पडला. या संवाद मेळाव्यात एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

Hello Vasai
Page No. 2 Feb 26, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# सदनिकेच्या नावावर तरुणाची फसवणूक

## आरोपीला पोलिसांनी केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सदनिकेच्या नावावर २४ वर्षीय तरुणाची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या व फरार इस्टेट एजंट आरोपीला शुक्रवारी रात्री पकडण्यात नालासोपारा पोलिसांना यश मिळाले आहे. या आरोपीने कोणाची सदनिकेच्या नावावर फसवणूक केली असेल तर त्यांनी कागदपत्रांसोबत पोलिस ठाण्याशी संपर्क करण्याचे आवाहन नालासोपारा पोलिसांनी केले आहे.

भाईंदरच्या संकल्प बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या रघुनंदन यादव (२४) या तरुणाची सदनिकेच्या नावावर फसवणूक केली होती. आरोपी रियल इस्टेट एजंट सचिन तरकचंद गाला (४०) याने ३ फेब्रुवारी २०२० मध्ये श्रीप्रस्थातील ड्रीम टॉवरमध्ये २२ लाख ७५ हजार रुपयांना सदनिकेचा व्यवहार केला होता. या व्यवहारापोटी

> तरुणाच्या फसवणूकप्रकरणी गुन्हा दाखल होता. त्या गुन्ह्यातील आरोपीला शुक्रवारी पकडून अटक केली आहे. शनिवारी वसई न्यायालयात आरोपीला हजर केल्यावर सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.
>
> - राहुल सोनवणे, पोलिस निरीक्षक, गुन्हे, नालासोपारा पोलिस ठाणे

रघुनंदन याच्याकडून रोख व धनादेशाद्वारे ५ लाख ६१ हजार रुपये घेतले. उर्वरित रकमेचे लोन करून देतो, असे आश्वासन देऊन त्यांचे कागदपत्रे घेऊन आशापुरा रियालिटी याच्या पावत्या दिल्या होत्या. ठरलेला सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण केला नाही व घेतलेली रक्कम परत न करता सदनिका खरेदीच्या व्यवहारात विश्वासघात करून फसवणूक केली होती.

Hello Vasai
Page No. 1 Feb 26, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner